# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३५५ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३५६**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३५७ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३५८**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३५९ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६०**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६१ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६२**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६३ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६४**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६५ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६६**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६७ अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६८**
**अपील क्र. MHSICMU/२०२१/M/०००३६९**

**अपिलार्थी श्री. ॲड. अदित्य श्रावस्ती**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
एच. आर. कॉलेज ऑफ इकॉनॉमिक्स,
१२३ दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२०

**प्रथम अपिलीय अधिकारी**
एच. आर. कॉलेज ऑफ इकॉनॉमिक्स,
१२३ दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२०

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.११.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०९.०९.२०२० | - | ११.१०.२०२० | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०२.०२.२०२१ रोजीच्या त्यांची १५ माहिती अर्जांन्वये विभिन्न विषयांवर माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन १५ द्वितीय अपील अर्ज दाखल केले आहेत. द्वितीय अपील सादर करताना अपिलार्थींनी नमुद केले की, त्यांना प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे आदेश मिळाले नाही व जन माहिती अधिकाऱ्यांकडून उत्तर प्राप्त झालेले नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तसेच त्यांचे अधिवक्ता उपस्थित असून त्यांनी असा मौखिक युक्तिवाद केला की, आज ज्या माहिती अर्जांचे अनुषंगाने द्वितीय अपील सुनावणी ठेवण्यात आलेली आहे त्याच विषयावर त्याच अपिलार्थींनी वर्ष- २०१९ मध्ये सुध्दा माहिती अर्ज सादर केले होते.

..२/-

सुनावणी दरम्यान अपिलार्थींचे अधिवक्तांनी वर्ष- २०१९ मध्ये दाखल केलेली माहिती अर्जाची प्रत संलग्न करुन नमुद केले की, अपील क्र. ०००३६०/२०२१, ०००३६१/२०२१, ०००३६३/२०२१, ०००३६४/२०२१, ०००३६५/२०२१, ०००३६६/२०२१, ०००३६७/२०२१, ०००३६८/२०२१, ०००३६९/२०२१ या अपिलांतील माहिती अर्जाचा विषय व अपिलार्थी यांनी वर्ष- २०१९ मध्ये केलेल्या माहिती अर्जाचा विषय एकसारखा आहे. त्याअनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली होती. नंतर अपिलार्थी यांनी सर्व अपीले मागे घेतलेली होती. अपिलार्थींनी लिहून दिले होते की, त्यांचा कॉलेजसोबत कोणताही वाद नाही.

जन माहिती अधिकाऱ्यांनी मौखिकरित्या सादर केले की, सर्व १५ प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केले आहे. सदर आदेश आयोगाचे अभिलेखावर उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांनी वर उल्लेखित ९ व्दितीय अपीलांविषयी त्यांचे लेखी निवेदन तसेच, उर्वरित राहिलेले ६ व्दितीय अपीलांविषयी त्यांचे लेखी निवेदन आयोगास १५ दिवसांत सादर करावे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

## आदेश

**सर्व १५ प्रकरणी पुढील सुनावणी दि. १३.१२.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०८.११.२०२४**